**<u>प्रेसनोट</u>** दिनांक ०७/०७/२०२४

वरळी पोलीस ठाणे, मुंबई हददीत आज दिनांक ०७/०७/२०२४ रोजी पहाटे ०५.२५ वाजता फिर्यादी श्री.प्रदिप लिलाधर नाखवा वय ५० वर्षे,व्यवसाय.मासेमारी,पत्ता.७१ सी नाखवा हाउस,शंकर मंदिरासमोर,तरे गल्ली,वरळी कोळीवाडा,मुंबई २५ हे त्यांची पत्नी नामे श्रीमती कावेरी प्रदिप नाखवा वय ४५ वर्षे पत्ता.वरीलप्रमाणे यांच्या सोबत त्यांचे मालकीचे सुझुकी कंपनीची ॲक्सेस स्कुटर क्र एम.एच ०१,डी.यु ६४१८ वरून ॲनी बेझंट रोड वरुन वरळी कोळीवाडयाकडे जात असताना लॅन्डमार्क जीप शोरूम समोर,डॉ.ॲनी बेझंट रोड, येथे मागुन येणा-या बीएमडब्लु कार क्र एम.एच ४८,ए.के-४५५४ या कारने स्कुटरला मागुन जोराची धडक दिली. सदर बाबत वरळी पोलीस ठाणेस खबर मिळाली असता वरळी पोलीस ठाण्यातील मोबाईल वाहन व स्टाफने जखमी अवस्थेत असलेल्या महिला नामे श्रीमती कावेरी प्रदिप नाखवा वय ४५ वर्षे यांना पुढील उपचाराकामी नायर हॉस्पीटल येथे घेवुन गेले असता तेथील अपघात विभागातील डॉक्टरांनी त्यांना तपासुन दाखलपुर्व मयत घोषीत केले.

यातील फिर्यादीने सांगितलेल्या जबाबानुसार वरळी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. ३७८/२४,कलम- १०५,२८१,१२५(ब),२३८,३२४(४) भारतीय न्याय संहिता सह कलम- १८४,१३४(अ),१३४(ब),१८७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्ह्यातील बीएमडब्लु कार क्र एम.एच. ४८,ए.के-४५५४ ताब्यात घेतली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चालु असुन सदर अनुषंगाने राजेश शहा व अपघाताचेवेळी सोबत असलेला व्यक्ती नामे राजऋषी राजेंद्रसिंग बिडावत यांना चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले आहेत.

-- ------------